# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

दिनांक 01/09/2021 (बुधवार)

(सायंकाळ)

---

### गैरकायदयाची मंडळी

पो.स्टे. बेला :— पोलीस स्टेशन बेला समोर येथे दिनांक 30/8/2021 चे 18.00 ते 22.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे— पोलिस शिपाई निलहंठ कठोरे पो. स्टे. बेला हे दि 30/08/2021 रोजी पो स्टे बेला येथे कर्तव्यावर हजर असतांना 18.00 चे सुमारास पो स्टे बेला येथे दाखल मर्ग क्र 23/2021 कलम 174 जा.फौ व अप क्र 124/2021 कलम 306,34 भादवी मधील मृतक नामे— संदीप लिलाधर वराडे, वय 22 वर्ष, रा. वार्ड क्र. 5 बेला याचे प्रेत त्याचे वडील आरोपी क्र. 1) लिलाधर रामंचद्र वराडे 2) दिपक वराडे 3) जिवन वराडे 4) अविनाश खडसे 5) सौ सुष्मा जिवन वराडे 6) सौ रेखा विठठल उरकुडे 7) श्यामा रोडे 8) राहुल मस्कर 9) अंदाजे 25 ते 30 वयाची पंजाबी ड्रेस घातलेली सडपातळ बांध्याची स्त्री 10) गावातील 300 जे 400 ईतर लोक यांनी पोलीस स्टेशन समोर येउन त्यांनी सदर मृतकाचे प्रेत पीएम झाल्यावर बेला पोलीस स्टेशन चे गेट समोर आणुन खाली जमीनीवर ठेउन प्रेताची अवहेलना केली. तसेच बेकायदेशीर जमाव यांनी पोलीस स्टेशन समोर बेकायदेशीरपणे जमाव करून आरडाओरडा करून शासनाची कोरोना वायरस प्रतिबंधक संबधांचे सर्व नियमाचे उलंघन केले. तसेच त्यांनी पायल आंबटकर, ज्ञानेश्वर आंबटकर व अशोक आंबटकर यांना आमच्या समोर आणा आम्हाला तिचे मंगळसुत्र तोडायचे आहे. त्यांना शिक्षा दयायची आहे जसे आमच्या मुलाला केले तसे आम्हाला त्यांचे सोबत करायचे आहे. त्यांना पण येथे जमीनीवर झोपवायचे आहे अशा वेगवेगळेया मागण्याकरून आरडाओरडा केली व शांतता भंग करून दंगा केला. त्यांना वांरवार सुचना देउनही सदरचा बेकायदेशीर जमाव हटला नाही.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलीस शिपाई निलकंठ कठोरे यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बेला येथे आरोपीतांविरुध्द कलम 143,145,147,149,297,188, भादवी सहकलम 110,112,117 मु.पो.का. भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री ठेंगणे मो.क्र. 7972812569 हे करीत आहे.

### दरोडा

पो.स्टे. कुही :— अंतर्गत 24 कि.मी अंतरावर पाचगाव येथे दिनांक 27.08.2021 चे 13.00 ते 28.08.2021 चे 10.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे— किसना पुरूषोत्तम येळणे, वय 45 वर्ष, रा. पाचगांव ता. उमरेड यांचे पाचगाव गावात व्दारकाई किराणा स्टोअर्स हे होलसेल व रिटेल दुकान आहे. त्यामध्ये तो अवैधरित्या चोरटी पध्दतीने सुगंधीत तंबाखु/गुटखा/सुगंधीत सुपारी चोरून विकत असल्याबाबत आरोपी 2) मंगल भिमराव सुरटकर वय 41 वर्ष दोन्ही रा. महादुला, कोराडी रोड नागपुर यांना माहिती मिळाल्यावर त्यांनी संगनमत करून 2 मोटरसायकलवर व 1 कार वाहन घेवुन फिर्यादीचे दुकानात आ.क्र. 1) कुणाल संजय मेश्राम वय 30 वर्ष रा. जगजिवन नगर, नागपुर यास 100 रू. देवुन सुगंधीत तंबाखु/गुटखा/सुगंधीत सुपारी खरेदी करण्यास पाठवुन खात्री पडुन, फिर्यादी चा भाऊ योगेश येळणे यास जबरदस्तीने खुर्चीवर बसवुन, त्याचा मोबाईल ताब्यात घेतले. यानंतर आरोपीतांनी दुकानातील सामानाची उलथा—पालथ करून सुगंधीत तंबाखु/गुटखा/सुगंधीत सुपारी चा शोध घेवुन, त्या वस्तु सापडल्यावर, फुड ॲन्ड ड्रग्ज व पोलीस कडुन कारवाई करतो व केस करतो वगैरे दमदाटी करून कारवाई

होवुन दयायची नसेल तर, सेटलमेंट करा अशी धमकी देवुन 6 लाख रू. ची मागणी केली. फिर्यादीने असमर्थता दर्शविल्यावर, 3 लाख रू. देण्यास सांगुन त्यापैकी फिर्यादी कडुन जबरीने 2 लाख रू. घेतले व दुसरे दिवशी उर्वरीत पैसे देण्याबाबत सांगीतले व नाही दिल्यास फुड ॲन्ड ड्रग्ज कडे तक्रार करीन अशी धमकी देवुन निघुन गेले. तसेच दुस–या दिवशी 1 लाख रू. साठी मोबाईल फोनवर संपर्क करून, 1 लाख रू. आणुन देण्यासाठी दमदाटी केली म्हणुन फिर्यादी हा व्यापारी असुन तो बदनामी मुळे भांबावुन व घबरून गेला होता. स्थानिक पत्रकार घनश्याम वैद्य यास भेटल्यावर त्यांनी धीर दिली.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीतांविरुध्द कलम 395 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. 1) कुणाल संजय मेश्राम वय 30 वर्ष रा. जगजिवन नगर, नागपुर व 2) मंगल भिमराव सुरटकर वय 41 वर्ष दोन्ही रा. महादुला, कोराडी रोड नागपुर ला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री मदने हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर